सन २०१८-१९ च्या पाणी टंचाई अंतर्गत बुलडाणा जिल्हयातील सिंदखेडराजा तालुक्यातील गोरेगाव, कोनाटी, जऊळका, पिंपरखेड, गारखेड येथील सार्वजनिक विहिरीवरुन टँकर भरण्यासाठी उपाययोजनांना प्रशासकीय मान्यता देणेबाबत..

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्रमांकः टंचाई २०१९ /प्र.क्र. १४१ /पापु १४

जी. टी. रुग्णालय संकुल इमारत, ७ वा मजला,
मंत्रालय, मुंबई ४०० ००१
तारीख: २५ जून, २०१९

वाचा -

१) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांक: टंचाई १०९९/प्र.क्र. १२/पापु १४, दिनांक ३.२.१९९९
२) शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांक: टंचाई २०१६/प्र.क्र.१४३/पापु १४, दिनांक ४.५.२०१६
३) विभागीय आयुक्त, अमरावती यांचे क्रमांक जा.क्र. उपआ/विकास/पाणी टंचाई /अका / कावि / ४२२/१९, दिनांक १८.०६.२०१९ चे पत्र.
४) शासन पत्र क्रमांक स्थासबै-२०१८/प्र.क्र. २०१ /पापु १४, दिनांक २५.०६.२०१९ (बैठकीचे इतिवृत्त)

प्रस्तावना -

विभागीय आयुक्त, अमरावती यांनी सन २०१८-१९ च्या पाणी टंचाई कालावधीसाठी तातडीच्या पाणी पुरवठा योजनेंतर्गत गोरेगाव, कोनाटी, जऊळका, पिंपरखेड, गारखेड ता. सिंदखेडराजा, जिल्हा बुलडाणा येथील सार्वजनिक विहिरीवरुन टँकर भरण्यासाठी उपाययोजनेचा रुपये १७,८९,७६०/- किंमतीचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. सदर प्रस्ताव पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ नागरी व ग्रामीण क्षेत्रातील विहित आर्थिक व भौतिक निकषाबाहेरील उपाययोजनांना प्रशासकीय मंजूरी देण्यासाठी अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या स्थायी समितीच्या दिनांक २१ जून, २०१९ रोजी झालेल्या बैठकीत मान्यतेसाठी विचारात घेण्यात आला.

सदर प्रस्तावाचे स्वरुप पाहता केवळ हायड्रन्ट तयार करण्याचे प्रस्तावित नसून तात्पुरत्या पाणी पुरवठा योजनेप्रमाणे पाईपलाईन, पंप इत्यादी उपांगे समाविष्ट आहेत. सबब शासन निर्णय, दिनांक १६ मे, २०१९ अन्वये विहित केल्यानुसार दिनांक १५ जून, २०१९ पर्यंत सदर प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्या स्तरावर मंजूर होणे आवश्यक होते. प्रस्तुत प्रकरणी विलंब झाल्याने स्थायी समितीने प्रस्ताव विचारात घेतला. अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या स्थायी समितीच्या दिनांक २१ जून, २०१९ रोजी झालेल्या बैठकीत या प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन प्रस्तावास मंजूरी देण्यात आली. त्या अनुषंगाने सदर प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

विभागीय आयुक्त, अमरावती यांनी गोरेगाव, कोनाटी, जऊळका, पिंपरखेड, गारखेड ता. सिंदखेडराजा, जिल्हा बुलडाणा येथील सार्वजनिक विहिरीवरुन टँकर भरण्यासाठी उपाययोजनेचा रुपये १७,८९,७६०/- (अक्षरी रुपये सतरा लाख एकोणनव्वद हजार सातशे साठ फक्त) प्रशासकीय मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव संदर्भ क्र. ३ च्या पत्रासोबत शासनास सादर केलेला आहे. सदर किंमतीच्या प्रस्तावास स्थायी समितीने दिनांक २१ जून, २०१९ च्या बैठकीत मान्यता दिलेली आहे. त्या अनुषंगाने या आदेशान्वये गोरेगाव, कोनाटी, जऊळका, पिंपरखेड, गारखेड ता. सिंदखेडराजा, जिल्हा बुलडाणा येथील सार्वजनिक विहिरीवरुन टँकर भरण्यासाठी उपाययोजनेच्या प्रस्तावास खालील अटींच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे :-

१) सदर प्रस्तावात नमूद केलेली पूरक पाणी पुरवठा योजना कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, बुलडाणा यांचेमार्फत राबविण्यात यावी.

२) सदर योजनेची कामे विहित पध्दतीने ई-निविदा मागविण्यात येऊन करावीत.

३) योजनेचे काम मान्यता प्राप्त किंमतीमध्येच पूर्ण होईल याची दक्षता घ्यावी.

४) सदर योजनेची प्रस्तावात नमूद केलेली कामे जिल्हा परिषद, बुलडाणा मार्फत पूर्ण करण्यात आल्यानंतर योजनेची देखभाल दुरुस्ती व योजनेचे व्यवस्थापन संबंधित जिल्हा परिषदेमार्फत करणे आवश्यक राहील.

५) ज्या विहिरीतून सध्या टँकरमध्ये पाणी भरले जात आहे, त्या विहीरींमध्ये आडवे बोअर, खोलीकरण इत्यादी उपाययोजना करुन पाण्याची आवक वाढविण्याबाबत तपासणी करण्यात यावी.

६) तसेच, प्रस्तावित ठिकाणच्या सार्वजनिक विहिरीवरील अस्तित्वात असलेल्या योजनेच्या पंपिंग संचांचा वापर करता येईल का याची पडताळणी करावी. कार्यरत योजनेच्या पंपचा वापर करणे शक्य असल्यास प्रस्तावित कामातील पंपाचे उपांगे वगळावे.

७) हया मंजूर करण्यात येणा-या तात्पुरत्या योजनेसाठी पाहिजे असलेल्या पाईप्स/पंप इत्यादी साहित्य जिल्हा परिषद / पंचायत समितीकडे जड वस्तु संग्रह मध्ये उपलब्ध असेल तर ती वापरावी.

८) पडताळणी करीत असताना निविदा प्रक्रीया सुरु ठेवावी तथापि, कार्यादेश देण्यापूर्वी सदर प्रक्रीया पूर्ण करुन कमी खर्चीक उपाययोजना घेण्यास प्राधान्य द्यावे व त्यानुसार आवश्यक असल्यास तथा अन्य पर्याय उपलब्ध नसल्यास कार्यादेश देण्यात यावेत. कार्यादेश देतांना पाऊस पडून टंचाई संपली असेल तर ही टंचाई निवारणांची कामे करु नये हे ही तपासून घ्यावे.

९) हया मंजूर करण्यात येणा-या तात्पुरत्या योजनेमध्ये वापरण्यात येणारी पाईप्स, पंप इत्यादी साहित्य या टंचाई कालावधीनंतर पुढील वर्षी याच ठिकाणी किंवा अन्य ठिकाणी वापरण्यासाठी काढून कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, बुलडाणा यांच्या ताब्यात ठेवण्यात यावे.

१०) विभागीय आयुक्त, अमरावती यांनी सदर योजनेकरिता निविदा प्रक्रिया झाल्यानंतर योजनेच्या सुरुवातीला ५०% इतका निधी द्यावा. तद्नंतर ३० % निधी विभागीय आयुक्त यांच्या स्तरावर योजनेची प्रगती विचारात घेऊन वितरीत करावा. उर्वरित २०% निधी योजना कार्यान्वितझाल्यानंतर देण्यात यावा.

११) योजनेचे काम मुदतीत पूर्ण होणे आवश्यक असल्याने योजनेच्या निविदा प्रक्रीयेपासून ते योजनेतून पाणीपुरवठा सुरु होईपर्यंत नियमित प्रगती अहवाल शासनास पाठविण्यात यावा.

१२) योजना पूर्ण झाल्यानंतर प्रस्तुत योजनेचा सविस्तर अहवाल (वरील अटींच्या अनुपालनासह) दिनांक ३१ जुलै, २०१९ पूर्वी शासनास सादर करावा.

२. याबाबत होणारा खर्च मागणी क्र. सी-६, २२४५ नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य, ०१- अवर्षण, १०२ पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, ९१ - राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकानुसार खर्च, (९१)(०१) पिण्याच्या पाण्याच्या आकस्मिक निकडीच्या पुरवठा (२२४५००९३) (दत्तमत) (वेतनेत्तर) - ३१, सहाय्यक अनुदाने या लेखाशिर्षाखालील तरतूदीमधून भागविण्यात यावा व त्याखाली अंतिमत: खर्ची टाकण्यात यावा.

३. हा शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ नागरी व ग्रामीण क्षेत्रातील विहित आर्थिक व भौतिक निकषाबाहेरील तात्पुरत्या पाणी पुरवठा योजना / उपाययोजनांना प्रशासकीय मंजूरी देण्यासाठी अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या सचिवस्तरीय स्थायी समितीच्या दिनांक २१ जून, २०१९ रोजी झालेल्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०६२५१७०६१२९४२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAJENDRA BHASKAR KUMATGI

Digitally signed by RAJENDRA BHASKAR KUMATGI
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=96d578360190574be078f90f44cde8446df6e461003bf3672f18f9dbab1603da, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=48c4e0a537923a17a2d48380c158034caa0569bf9dce61f86ab5a8724cddfebe, ou=WATER SUPPLY AND SAINITAION, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=RAJENDRA BHASKAR KUMATGI
Date: 2019.06.25 18:49:18 +05'30'

(राजेंद्र कुमटगी)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखाकार, (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई
२. महालेखाकार, (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-२, नागपूर
३. अपर मुख्य सचिव, (म.व पु.) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
४. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
५. प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
६. सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
७. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, नवी मुंबई
८. विभागीय आयुक्त, अमरावती
९. जिल्हाधिकारी, बुलडाणा
१०. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलडाणा
११. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, बुलडाणा
१२. मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
१३. मा. राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
१४. अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांचे स्वीय सहायक
१५. उप सचिव (पापु १४) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांचे स्वीय सहायक
१६. पापु १४ (निवडनस्ती)